REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गानिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख २२ मे, १९४० अंक २१

लेखक—अत्रे.

अर्धांगी

दिग्दर्शक-विनायक

( वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि. चे (खास व्यवस्थेखालील) पुणें मिनव्हांत पुणें-फोन ३९८ ४था आठवडा

लेखक—आचार्य अत्रे, दिग्दर्शक—विनायक, छायालेखक—पांडुरंग नाईक.

भूमिका:—विनायक, लीला चिटणीस, मीनाक्षी, साळवी, मालवणकर, सौ. वसिष्ठ, कु. देशपांडे, आणि बाबुराव पेंढारकर

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए., कँटब, बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील ॲंड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.
हेड ऑफिस—जळगांव, पू. खा.
एजन्सीकरितां आजच लिहा.
ब्रँच ऑफिस—लक्ष्मीरोड, पुणें.

पूर्ण स्वदेशी,
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त
विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

## विविध माहिती

### साखर समितीची सभा

इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें नेमलेल्या साखर समितीची सभा सिमला येथें जूनच्या १७, १८, १९ ह्या तारखांस भरणार आहे.

### हिंदी बुटांचा इंग्लंडमध्यें पुरवठा

ब्रिटिश फौजेच्या उपयोगासाठी हिंदुस्थानांतून दर महिन्याला सव्वा लक्ष स्वदेशी बुटांच्या जोड्या पाठवण्यांत येतील. एक कोटि रुपयांचे बूट पुरवण्याची ऑर्डर हिंदी कारखान्यांनीं स्वीकारली आहे.

### ब्रिटिश सैनिकांचा खर्च

प्रत्येक ब्रिटिश सैनिकाचा ब्रिटिश सरकारास दर वर्षी सरासरीनें ८ हजार रुपये खर्च येतो.

### लवचिक कांच

कांचेंत लवचिकपणा आणण्याच्या प्रयत्नांस यश आलें असून तिचा उपयोग पिशव्या, कमरपट्टे, इत्यादि नित्याच्या वापरावयाच्या अनेक वस्तू बनवण्याकडे लवकरच होईल असा रंग दिसतो.

### पॅरिसमध्यें सायकली वाढल्या

युद्ध चालू झाल्यापासून पॅरिस शहरांत सायकलींची संख्या ३८ टक्के वाढली आहे आणि टॅक्सींची ४० टक्के कमी झाली आहे.

### गुप्त कामगिरीसाठी दीड कोटि रुपये खर्च

गुप्त कामगिरीसाठी ब्रिटिश सरकार पूर्वीच्या मानानें पुष्कळ अधिक खर्च करीत आहे आणि त्याची रकम अलीकडे दर वर्षास दीड कोटि रुपयांपर्यंत वाढली आहे.

### वंगणाचीं तेलें

यंत्रांमध्यें वंगणांसाठी वापरावयाच्या तेलांच्या निर्गत व्यापारावर इंग्लंडमध्यें कडक निर्बंध घालण्यांत आले आहेत. हिंदुस्थानांतील व ब्रह्मदेशांतल्या विपुल तेलांचा उपयोग ब्रिटिश तेलांच्या ऐवजी करावा असें सुचवण्यांत आलें आहे. अगदी अपरिहार्य असेल अशा बाबतींतच ब्रिटिश तेल बाहेर जाऊं दिलें जाईल.

### प्रांतिक आर्थिक सल्लागार

हिंदुस्थान सरकारच्या धर्तीवर कांहीं प्रांतिक सरकारें आर्थिक सल्लागार नेमणार असल्याचें समजतें. बाजारभावांचें नियंत्रण एवढेंच काम युद्ध चालू असेपर्यंत त्यांचेकडे सोपवलें जाईल.

### पुण्यांतील विजेचे दर

पुण्याच्या हद्दींत वीज पुरवण्याच्या सरकारी परवान्यास अनुसरून विजेच्या कमाल दरांत कांहीं फेरफार करणें जरूर आहे कीं काय, ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी मुंबई सरकारानें दिवाण बहादुर जव्हेरी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली आहे. श्री. अण्णासाहेब वर्तक हे त्या कमिटीचे एक सभासद आहेत.

### अमेरिकन लढाऊ विमानांस मागणी

सुमारें १०० कोटि रुपये किंमतीच्या लढाऊ विमानांची ऑर्डर दोस्त राष्ट्रांच्या वतीनें गेल्या चार आठवड्यांत देण्यांत आली असून आणखी दोन ऑर्डरी लवकरच देण्यांत येणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

### विमानी छत्रीवर सशस्त्र सैनिक

विमानी छत्रीच्या आश्रयानें उड्डाण करून प्रतिस्पर्ध्यांच्या फौजेच्या मागें उतरून फंद्फितुरी व दगाफटका करण्यासाठी सशस्त्र सैनिकांचा उपयोग जर्मनीनें हॉलंड व बेल्जम येथें केला आहे. परंतु ह्या वस्तुतीचा यशस्वी रीतीनें प्रतिकार होत आहे.

### डच ईस्ट इंडीजशी व्यापार

हॉलंड जर्मनीच्या हातीं गेलें असलें तरीं त्याच्या डच ईस्ट इंडीजमधील वसाहतींशीं होणारा हिंदुस्थानचा व्यापार पूर्वीप्रमाणें चालू राहील असें हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केलें आहे.

### तोफांचा धूमधडाका

बेल्जम आणि फ्रान्स ह्यांच्या बाजूकडील इंग्लंडच्या किनाऱ्याशेजारील भागांत त्या देशांमध्यें सध्या जें तुमुल युद्ध चाललें आहे त्यांतील तोफांच्या धूमधडाक्याच्या आवाजानें भूकंपाप्रमाणें घरें हादरलीं असें सांगतात. ह्यावरून बेल्जममधील रणांगणावर कशा प्रकारचा आणीबाणीचा झगडा चालू आहे ह्याची कल्पना येईल.

### गुन्हेगारीचें प्रमाण

गुन्हेगारीचें प्रमाण स्त्रियांपेक्षा पुरुषांत अधिक आढळतें. विशेषतः गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचे बाबतींत पुरुष आणि स्त्री गुन्हेगारांचें प्रमाण ८:१ असें ग्रेटब्रिटनमध्यें १९३८ सालीं पडलें.

### हिंदुस्थानांतील बहुमोल वनस्पति

हिंदुस्थानांत आढळणाऱ्या अकरा हजार निरनिराळ्या जातींच्या वनस्पतींपैकी दोन हजारांमध्यें औषधी गुण आहेत. त्यांचा शास्त्रीय पद्धतीनें उपयोग करून घेण्याचें महत्त्व विशेष आहे आणि युद्धकाळांत औषधांचा तुटवडा पडूं लागला म्हणजे तें चांगलें जाणवतें. जरूर संपली म्हणजे मात्र त्यांचा विसर पडतो.

### औषधांचा पुरवठा

शास्त्रीय पद्धतीनें बनवलेल्या औषधांचा पुरवठा युद्ध चालू आहे तोंपर्यंत काटकसरीनें उपयोगांत आणला जाण्याच्या व्यवस्थेची चर्चा एका परिषदेंत सिमला येथें नुकतीच झाली.

### खाद्य जिनसांचें नियंत्रण

युद्ध परिस्थितीमुळें लोकांनीं वापरावयाच्या विशिष्ट नित्योपयोगाच्या जिनसांच्या प्रमाणांचें नियंत्रण इंग्लंडमध्यें सरकारनें केलें आहे. लोणी, साखर, मांस वगैरे जिनसांचा उपयोग अधिक मर्यादित केला जाणार आहे.

### एका वर्षांत तीन अंदाजपत्रकें

१२ महिन्यांचे अवधींत तीन अंदाजपत्रकें पार्लमेंटास सादर करणारे सर जॉन सायमन हे पहिलेच ब्रिटिश फडनवीस आहेत. १९३१–३२ ह्या मुदतींत तीन ब्रिटिश बजेटें झालीं, परंतु त्यांतील दोन लॉर्ड स्नोडन (त्यावेळीं मि. फिलिप स्नोडन) ह्यांनीं मांडलीं होतीं आणि तिसरें बजेट मि. नेव्हिल चेंबर्लेन ह्यांचें होतें. चालू वर्षांतील तीनहि अंदाजपत्रकें सर जॉन सायमन ह्यांनींच सादर केलीं आहेत.

### ७५ वर्षें सुखाचें संसार

मिस्टर आणि मिसेस जेम्स वेस्ट ह्या दांपत्याच्या वैवाहिक जीवनाचीं ७५ वर्षें नुकतींच पुरीं झालीं. हा दिवस त्यांनीं एका नाटकांत नायक आणि नायिका ह्यांची कामें करून साजरा केला. मि. वेस्ट ह्यांचें वय १०० असून त्यांच्या पत्नीचें वय ९९ आहे. त्यांचे वंशज किती व कोठें आहेत, ह्याचा त्यांना पत्ता नाहीं.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २४२ | ५ रिझर्व्हेशन मेकान्स शेअर्स | २४५ |
| २ बंगालची जमीनदारी पद्धति ... | २४३ | ६ हिंदी कारखाने व त्यांतील कामगार | २४७ |
| ३ न्यायमूर्ति रानडे ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण | २४४ | ७ एक्सचेंज बँकांच्या अध्यक्षांचीं भाषणें | २४८ |
| ४ स्फुट विचार ... | २४५ | ८ जमीनकुळीविषयक एक निवाडा | २४९ |
| बेल्जममधील रणांगण—तटस्थपणाचें बक्षीस—युद्धपरिस्थिति गंभीर पण आटोक्यांत—सर्वपक्षांच्या एकीकरणाची आवश्यकता | | ९ मुंबई प्रांताचें आरोग्य | २५० |
| | | १० कॉफी ... | २५० |
| | | ११ निवडक बाजारभाव | २५१ |

अर्थ

बुधवार, ता. २२ मे, १९४०

## बंगालची जमीनदारी पद्धति

हिंदुस्थानांत जमीनधाऱ्याच्या आणि जमीनमहसुलाच्या ज्या निरनिराळ्या पद्धति रूढ आहेत, त्यांमध्यें बंगालमधील जमीनदारी पद्धतीस विशेष इतिहास आहे. ह्या पद्धतीचीं दोन वैशिष्ट्यें ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. तीमध्यें सरकारदेणें एकदाच कायम ठरवण्यांत आलें असून त्यांत वाढावा होण्याची तरतूद नाहीं आणि हें देणें शेत कसणाऱ्या कुळांकडून सरकार वसूल करीत नसून त्याबद्दल जमीनदार मालक जबाबदार असतो. मुंबई प्रांतांत रयतवारी पद्धति अमलांत आहे आणि तीमध्यें खातेदारांकडून जमीनधाऱ्याची रकम वसूल होते आणि सरकार व शेतकरी ह्यांचेमध्यें तिसरा मध्यस्थ असत नाहीं. इकडे खंडकरी कुळें आहेत, नाहींत असें नाहीं, पण बंगालमध्यें सरकारनें जमीनदार कायद्याच्या करारानें निर्माण करून त्यांनीं सारा वसूल करून त्याचा निश्चित अंश सरकारी तिजोरींत भरला पाहिजे अशी कायमची व्यवस्था केली आहे. बंगालमध्यें ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल चालू झाला तेव्हां सरकारचा सारा वसूल करणारे मध्यस्थ पूर्वींच्या अमदानींत असल्याचें तिला आढळून आलें. व्यक्तिशः रयतांच्याकडून सरकारी अधिकाऱ्यांनीं जमीनीचा सारा वसूल करण्याच्याऐवजी किंवा हें काम मक्त्यानें मध्यस्थाकडे वेळोवेळ सोंपवण्याचे ऐवजीं कांहीं अंशीं आमच्या इकडच्या खोतांप्रमाणें कायमच्या करारानें विशिष्ट लोकांस जमीनदार बनवण्याचें आणि त्यांनीं शेतकऱ्यांकडून जमा केलेल्या साऱ्याचा मोठा अंश तिजोरींत त्यांचेकडून घेण्याचें तिनें ठरवलें. सारा देणारा शेतकरी व सरकार ह्यांचा प्रत्यक्ष संबंध नाहींसा होऊन मध्यस्थ जमीनदार जमिनीचा मालक बनला आणि तो खंड वसूल करून त्यांतला निश्चित अंश सरकारी तिजोरींत भरण्यास बांधला गेला. लॉर्ड कॉर्नवॉलिस ह्यांनीं ह्याप्रमाणें जमीनमहसुलाच्या वसुलाच्या सोयीसाठी इंग्लंडच्या धर्तीवर जमीनदारांचा वर्ग स्थापन केल्यासारखें झालें आणि त्यांस सारा देणारे शेतकरी त्यांचे खंडकरी बनले.

ही जमीनदारीची पद्धति कांहीं काळपर्यंत सोयीची वाटली तरी कुळांच्या हक्कांचे दृष्टीनें तीमध्यें ठळक दोष असल्याचें दिसून आलें. ह्या कुळांचे जमिनीमध्यें विशिष्ट हक्क निरनिराळ्या प्रकारचे होते, त्यांस कायद्यानें मान्यता देणें आणि जमीनदारांच्या अधिकारास मर्यादा घालणें आवश्यक झालें. दुसरें असेंहि झालें कीं, जमीनदारांनीं जमा करावयाच्या खंडाची रकम क्रमाक्रमानें वाढत गेली, पण जमीनदारांनीं सरकारास द्यावयाच्या महसुलाची रकम कायम राहिली. मुंबईच्या रयतवारी पद्धतींत दर तीस वर्षांनीं जमीनमहसुलाची फेरचौकशी होऊन त्यांत वाढावा होतो; ह्या कारणानें शेतकऱ्यांच्या दृष्टीनें बंगालची कायमधाऱ्याची पद्धति चांगली असें हिंदी लोकमत कित्येक वर्षेंपर्यंत प्रचलित होतें. तथापि, बंगालच्या सरकाराचें जमीनीचें उत्पन्न खर्च वाढला तरी वाढणें अशक्य होतें आणि त्यांचे व निरनिराळ्या दर्जाच्या कुळांचे हितसंबंध भानगडीचे व वादग्रस्त झाले होते. ह्या कारणानें तेथील कायमधाऱ्याच्या जमीनदारीपद्धतींत बदल व्हावा अशा सूचना वारंवार करण्यांत येत होत्या. सरकारशीं झालेल्या कायदेशीर करारास अनुसरून ही पद्धति चालू झाल्यानें तीमध्यें महत्त्वाचे फेरबदल करतां येत नाहींत आणि प्राप्तीवरील करासारखे करहि बसवतां येत नाहींत असें जमीनदारांचें म्हणणें होतें. ह्या रीतीनें ह्या वादग्रस्त प्रश्नाची चर्चा अनेक वर्षें चालली होती आणि कायदेमंडळास पूर्णपणें जबाबदार असलेलीं प्रांतिक मंत्रिमंडळें अधिकारारूढ झाल्यावर तिला तीव्र स्वरूप प्राप्त झालें. जमीनदारांचे सर्व हक्कच सरकारनें विकत घेऊन टाकावे अशी एक सूचना मागें अनेकवार करण्यांत आली होती, ती आतां जोरानें पुढें येणें स्वाभाविक होतें.

बंगाल सरकारनें कायमधाऱ्याच्या जमीनदारी पद्धतीचा सांगोपांग विचार करून तिच्या संबंधानें शिफारशी करण्यासाठी एक प्रातिनिधिक समिति दीड वर्षामागें नेमली होती. तिचा रिपोर्ट आतां प्रसिद्ध झाला आहे आणि जमीनदारी पद्धति एकाकाळीं योग्य वाटली असली तरी सध्याच्या परिस्थितींत ती सदोष ठरली असून तिला फाटा देण्याची वेळ आली आहे असें तिनें बहुमतानें सुचवलें आहे. जमीन कसणारीं कुळें जमीनदारांचे खंडकरी आज आहेत, त्याच्याऐवजीं ते सरकारास महसूल देणारे करदार व्हावे असें तिचें म्हणणें आहे. समितींतल्या जमीनदार अल्पमतवाल्यांस हा अभिप्राय मान्य नाहीं हें सांगावयास नको. जमीनदारांस प्राप्त झालेले आणि ते अनेक वर्षें उपभोगींत असलेले अधिकार व हक्क त्यांच्या हातून काढून घ्यावयाचे असतां त्यांस मोबदला देणें युक्त व न्याय्य आहे. हा मोबदला कोणत्या हिशेबानें द्यावा ह्याविषयींहि समितीच्या सभासदांमध्यें मतभेद झाला आहे. जमीनदारीचे हक्क उपभोगणारांस त्यांस मिळत असलेल्या फायद्याच्या दसपट रकम देऊन ते हक्क सरकारनें आपलेकडे घ्यावे असें बहुमतवाल्यांचें म्हणणें आहे. निरनिराळ्या वर्गांच्या जमिनींपासून येणाऱ्या खंडाची नक्त रकम १२ कोटि रुपये आहे असा समितीचा हिशेब आहे. ह्या रकमेंतून सरकारचें जमिनीच्या महसुलाचें उत्पन्न, जमीनदार देत असलेला लोकलफंड व १८ टक्के जमीनदाऱ्यांच्या व्यवस्थेचा खर्च ह्या बाबी वजा केल्या असतां ७ कोटि, ७९ रुपये बाकी रहातात. जमिनीच्या निवळ खंडाच्या ह्या रकमेच्या दसपट मोबदला जमीनदारांस देऊन टाकावा अशी शिफारस कमिटींतील बहुमताच्या सभासदांची आहे. मोबदला रोखीनें किंवा रोख्यांच्या स्वरूपांत देण्यांत यावा असें सुचवण्यांत

आलें आहे. कोळशाच्या खाणी व मासेमारी ह्याविषयींचे हक्कहि अशाच रीतीनें विकत घेण्यांत यावे असें समितीमधील बहुमतवाल्यांचें सांगणें आहे. अल्पमतवादी सभासदांच्या भिन्न मतपत्रिका रिपोर्टास जोडल्या आहेत. त्यांपैकीं कांहींनीं असें म्हटलें आहे, कीं बहुमतवादी सभासदांनीं केलेल्या सूचना क्रांतिकारक स्वरूपाच्या असून त्या परिस्थितीस धरून व योग्य नाहींत. रयतांची आर्थिक स्थिति दर्शविल्याप्रमाणें असमाधानकारक नाहीं आणि जमीनदारांचे हक्क काढून घेण्याच्या योजनेस समितीपुढें आलेल्या पुराव्याचा व साक्षींचा आधार नाहीं. मोबदल्याची रकम अधिक आणि खरच्या दरानें आकारण्यांत यावी असेंहि त्यांनीं म्हटलें आहे. शेतीवरील कर जमीनदारांवर बसवला जाण्यासहि त्यांचा विरोध आहे. जमीनदारवर्गाच्या प्रतिनिधींचा अभिप्राय वरील आशयाचा असावा हें अगदीं स्वाभाविक आहे. पण डॉ. राधाकुमुद मुकर्जी ह्यांनीं असें मत प्रतिपादलें आहे कीं, बंगाली रयत इतर प्रांतांतील शेतकऱ्यांच्या मानानें अधिक सुखी असून तीस हक्कहि अधिक आहेत. ह्याच्या उलट, दुसऱ्या एका सभासदानें असें म्हटलें आहे कीं, हिंदु राजवटींत शेतकऱ्यांस मालकी हक्क होते ते इंग्रजी कायमधाऱ्याची पद्धति चालू झाल्यानंतर काढून घेण्यांत आले. बंगालच्या जमीनदारांस मोबदला द्यावयाचा म्हटलें तर फार मोठी रकम प्रांतिक सरकारास उभी करावी लागणार आहे ही गोष्ट येथें लक्षांत घेतली पाहिजे. तथापि, जमीनदारांस मोबदला मिळणार असल्यानें त्यांच्या विरोधाची तीव्रता पुष्कळ कमी होईल ह्यांत शंका नाहीं.

## न्यायमूर्ती रानडे ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण

### प्रो. काळे ह्यांचें भाषण

पुण्यांतील सेवानिवृत्तांचें चौथें संमेलन गेल्या मंगळवारीं प्रो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं यशस्वी रीतीनें पार पडलें. संध्याकाळच्या अधिवेशनांत विश्राम मंडळ संस्थेस स्थैर्य आणण्यासाठी योजावयाच्या उपायांची चर्चा झाली. मंडळास स्वतःच्या मालकीचें घर असावें आणि निधि असावा आणि परस्पर सहाय्याच्या तत्त्वावर माल खरेदी-विक्रीची त्याच्या सभासदांनीं व्यवस्था करून उद्योगधंद्यांच्या संघटनेचा पाया घालावा, ह्याविषयीं एकमतानें सूचना मान्य करण्यांत आल्या. वरील सर्व बाबतींत अल्पप्रमाणावर उपक्रम केलेला आहे, त्यास सभासदांनीं जोराचा हातभार लावावा अशी विनंति करण्यांत आली.

प्रो. पिंपळखरे ह्यांनीं विश्राम मंडळास न्यायमूर्ती रानडे ह्यांचें एक तैलचित्र काढून विनामूल्य दिलें आहे, त्याचा अनावरण समारंभ यानंतर झाला. मंडळाचे अध्यक्ष, श्री. बाबासाहेब देशपांडे, ह्यांनीं ह्या समारंभाचें विशेष औचित्य काय आहे, हें समजावून सांगितलें आणि प्रो. पिंपळखरे ह्यांच्या उदार देणगीबद्दल त्यांचे आभार मानले. प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत न्यायमूर्ती रानडे ह्यांच्याशीं आपला संबंध लहानपणापासून कसा घडून आला ह्याची हकीकत सांगितली आणि सर्वांनीं विशेषतः सेवानिवृत्तांनीं घ्यावयासारख्या त्यांच्या गुणांचें वर्णन केलें. न्यायमूर्तींनीं सरकारी नोकरींत असतांना इतर पुढाऱ्यांच्यापेक्षांहि अधिक असें लोकहिताचें काम केलें. त्यांची बुद्धिमत्ता सर्वांस नसली तरी त्यांची श्रम करण्याची तयारी, त्यांचा अभ्यासूपणा आणि राष्ट्राच्या उन्नतीविषयींची त्यांची कळकळ ह्या गोष्टी अनुकरणीय आहेत. सरकारी पेन्शनर मंडळीस हाताशीं धरून व प्रोत्साहन देऊन त्यांनीं सार्वजनिक कामें करून घेतलीं, आणि ह्या रीतीनें विश्राम मंडळास मार्ग दाखवून दिला. रावसाहेबांस स्पेशल जज्ज ह्या नात्यानें फिरतीचीं कामें करावीं लागत. त्यावेळीं प्रत्येक शहरीं व मध्यम वस्तीच्या गांवीं ग्रंथालय स्थापण्यास, व्याख्यानमाला चालू करण्यास व सामाजिक संस्था स्थापावयास ते उत्तेजन देत. श्री. बाबासाहेब देशपांडे ह्यांनीं नोकरीवर असतांना पुढें मराठी इतिहासाचें संशोधन करावयाचें ह्या विषयींची तयारी सतत चालवली होती हें मला माहीत आहे. त्याप्रमाणें ज्या सरकारी अधिकाऱ्यांनीं कोणत्याना कोणत्या कार्याची स्वतःमध्यें आवड उत्पन्न केली असल्यास पेन्शन घेतल्यावर आतां काय करावें, हा प्रश्न त्यांस त्रास देणार नाहीं.

न्यायमूर्तींची कामाची बैठक मोठी दांडगी होती आणि दररोज बारा तास वाचन-लेखनाचें काम करण्याचें त्यांस कांहींच वाटत नसे. माझ्यासारख्या तरुणासहि त्यांच्या "रीडर" चें काम त्याप्रमाणें बैठक मारून करण्याचें अवघड जाई. ज्याची जशी प्रवृत्ति किंवा अनुभव तसें काम त्यास न्यायमूर्ती सांगत असत. त्यांच्याकडे गेलें असतां आपणामागें कांहीं तरी काम लागणार म्हणून लोक बिचकत असत. राष्ट्रीय उन्नतीचें काम इतकें विस्तृत आणि बहुरंगी आहे कीं, आमच्यापैकीं प्रत्येकास त्यांतला एखादा भाग सहज उचलतां येईल. न्यायमूर्तींची श्रद्धा, कळकळ आणि श्रम करण्याची इच्छा मात्र पाहिजे. आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, धार्मिक, वाङ्मयविषयक, शैक्षणिक, अध्यात्मिक सर्वच विषय त्यांनीं हातीं घेतले आणि लोकांस प्रेरणा देऊन त्यांचेमध्यें जागृति उत्पन्न केली.

सध्याच्या मतामतांच्या गलबल्यामध्यें आपलें ध्येय व वर्तन कसें असावें हा प्रश्न आपणा प्रत्येकास सोडवावा लागतो. विशेषतः सेवानिवृत्तांवर बुरसटलेपणाविषयींची टीका होते आणि नवमतवाद्यांचा हल्ला होतो, त्यांस न्यायमूर्तींच्या चरित्रापासून पुष्कळ शिकण्यासारखें आहे. रावसाहेब समाज सुधारक होते आणि त्यांच्या काळीं 'दुर्धरकां'कडून सुधारकांवर वाटेल तशी टीका होत असे. वेडीवांकडी टीका ही महाराष्ट्रांत आजकालची नवी गोष्ट नाहीं. शिवराळ व वैयक्तिक टीकेच्या आघातास मनाचा समतोलपणा न ढळूं देतां सरळ व मृदु शब्दांत उत्तर देणें हा प्रतिस्पर्ध्यांचा हल्ला परतवण्याचा त्यांचा यशस्वी मार्ग होता. न्यायमूर्ती धार्मिक वृत्तीचे होते आणि हिंदी संस्कृतीविषयीं त्यांस मोठा अभिमान वाटत असे. परंतु ही संस्कृति टिकवण्यास आपले आचारविचार व चालीरीति ह्यांमध्यें कालास अनुसरून फेरबदल करणें अगत्याचें आहे असें ते म्हणत. स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, जातिभेद, ह्यांचे बाबतींत आपल्या समाजांत अलीकडे विलक्षण क्रांति घडून आली आहे. आणि सनातन्यांच्या अंगावर बाजू आली आहे. तेव्हां नव्या विचारास सरसहा विरोध करण्यांत आतां स्वारस्य नाहीं. न्यायमूर्तींवर सनातन्यांप्रमाणें सुधारकांकडूनहि टीका होत असे; पण व्यावहारिक दृष्टीनें व मुत्सद्दीपणानें तिच्याकडे ते पहात असत. आणि तडजोडीच्या धोरणानें वागत. हिंदी राष्ट्राची सर्वांगीण प्रगति हें त्यांचें ध्येय होतें आणि त्या ध्येयाच्या प्राप्तीसाठीं ते अहर्निश झटत व संघटित प्रयत्न करीत. कार्याकडे दृष्टि ठेवून सर्व संग्राहक वृत्तीचा अवलंब केल्यानें त्यांस एवढें मोठें सार्वजनिक हिताचें काम करतां आलें.

विश्राम मंडळांत असल्या सत्पुरुषाचें तैलचित्र आपल्या डोळ्यांपुढें सतत रहाणार आहे. त्यापासून आपणा सर्वांस उच्च ध्येयाची, प्रगतीची व सत्कार्याची स्फूर्ति प्राप्त व्हावी अशी इच्छा प्रदर्शित करून प्रो. काळे ह्यांनीं आपलें भाषण पुरें केलें.

## स्फुट विचार

### बेल्जममधील रणांगण

युद्ध दीर्घकाल चालू राहूं देणें म्हणजे स्वतःच्या शक्तीचा ऱ्हास होऊ देणें होय, ह्या गोष्टीची हिटलरला जाणीव असल्यानें त्यानें हॉलंडमधून बेल्जममध्यें प्रवेश केला आणि त्याच वेळीं फ्रान्समध्यें घुसण्याचा घाट घातला. मॅजिनो तटबंदीला बगल देऊन आणि बेल्जमच्या मार्गानें फ्रान्समध्यें रणक्षेत्र निर्माण करण्याचा हा बेत होय. लढाऊ विमानें आणि चिलखती गाड्या ह्यांची मर्यादित आघाडीवर गर्दी करून बेल्जम व फ्रान्स ह्या देशांत चाल केली असतां दोस्त राष्ट्रांच्या संरक्षणाची फळी फोडतां येईल अशी हिटलरची कल्पना होती. हॉलंडमध्यें जर्मन फौजांस विरोध होऊन त्यांचें आक्रमण कांहीं काळपर्यंत थोपवून धरतां येईल अशी अपेक्षा होती ती खरी ठरली नाहीं आणि डच सैन्यानें आपलीं शस्त्रें खालीं ठेवलीं. जर्मनीच्या माऱ्यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं आणि आपल्या लोकांची निष्कारण प्राणहानि होईल हें जाणून डच सेनाधिपतींनीं प्रतिकार तात्काळ बंद केला. हॉलंडच्या हांकेस ओ देऊन जर्मनीच्या प्रतिकारार्थ सहाय पाठवण्यास दोस्त राष्ट्रांस अवसर मिळाला नाहीं. ह्याचा परिणाम असा झाला कीं, जर्मन फौजांची चाल हॉलंडमधून बेल्जममध्यें त्वरित झाली. ह्या रीतीनें मागील युद्धाप्रमाणें बेल्जम देशाचें मुख्य रणक्षेत्र बनलें. यत्किंचितहि विलंब न लावतां इंग्लंडनें आपल्या फौजा बेल्जममध्यें पाठवून जर्मन फौजांस बेल्जम सैन्याच्या बरोबरीनें तोंड दिलें. ब्रिटिशांचीं विमानें आणि चिलखती गाड्या ह्यांनीं जर्मनांची चढाई चांगलीच कुंठित करून टाकली. फ्रेंच सरहद्दीवरहि जर्मन सैन्याची प्रगति सेडनच्या बाजूस मंदावली आहे. जर्मनीनें प्रथम जी मुसंडी मारली होती तिची तीव्रता फ्रेंचांच्या जोराच्या विरोधानें कमी झाली आणि ब्रिटिश विमानांचा प्रभाव जर्मन सैन्यास जाणवला. बेल्जम, इंग्लंड व फ्रान्स ह्यांचें बळ आतां एकवटलें आहे आणि त्यांच्या एकत्रित झालेल्या शक्तीशीं जर्मनीस झगडावें लागणार आहे. प्रारंभीच्या गर्दीत मिळालेल्या यशानें हुरळून जर्मन फौजा पुढें जातील तेव्हां त्यांच्या महत्त्वाकांक्षेस चांगला धक्का बसल्यावांचून रहावयाचा नाहीं.

---

### तटस्थपणाचें बक्षिस

डेन्मार्क व हॉलंड ह्यांनीं शेवटपर्यंत आपला तटस्थपणा अबाधित राखण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, पण अखेर ह्या धोरणाचें प्रायश्चित्त त्या राष्ट्रांस जर्मनीकडून मिळालें. त्यांचा तटस्थपणा अर्थातच स्वार्थप्रेरित होता आणि त्याबद्दल त्यांस दोष देण्यांत स्वारस्य नाहीं. दोस्त राष्ट्रांचेविषयीं त्यांस सहानुभूति वाटत असली तरी ती प्रकट करणें त्यांस अशक्य होतें. जर्मनी कोणतेंहि कारण नसतां आपणांवर स्वारी करून आपलें स्वातंत्र्य नाहींसें करील अशी भीति त्यांस वाटत होती. पोलंड, फिन्लंड वगैरे राष्ट्रांची जर्मनीनें काय दुर्दशा केली हें त्यांस चांगलें ठाऊक असल्यानें आणि स्वतःच्या अल्प बळावर स्वसंरक्षण करणें अशक्य असल्याकारणानें त्यांच्या तटस्थपणाची स्थिति अनुकंपनीय झाली होती. स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क व हॉलंड ह्या राष्ट्रांनीं रूसो–फिनिश युद्धाचे वेळीं आपल्या संरक्षणाची तजवीज एकजुटीनें केली असती तर आजच्या युद्धाचा नूर बदलला असता, दोस्त राष्ट्रांशीं दोन हात करण्यास जर्मनी तटस्थ राष्ट्रांच्या प्रदेशामधून आपलीं सैन्यें फ्रान्सच्या बाजूस नेल्यावांचून रहाणार नाहीं हें उघडच होतें. तथापि, जर्मनीचा रोष स्वतःवर ओढून घेण्याची ह्या लहान तटस्थ राष्ट्रांची तयारी नव्हती. त्यांच्या इच्छेविरुद्ध आपलें सहाय त्यांचेवर लादणें दोस्त राष्ट्रांसहि योग्य वाटलें नाहीं. पण ह्या नैतिक विचारानें जर्मनीस कधींच त्रास दिला नाहीं; आणि संधी येतांच हिटलरनें डेन्मार्क व हॉलंड चुटकीसरशी पादाक्रांत करून टाकली. हा सर्व प्रकार अमेरिका दुरून पहात आहे. प्रेसिडेंट रूझव्हेल्ट इटलीनें शांतता राखावी आणि युद्धाचा वणवा अधिक पेटूं नये म्हणून प्रयत्न करीत आहेत. अमेरिकन राष्ट्र तरी किती दिवस स्वस्थ बसणार हा आतां प्रश्नच आहे. मागील युद्धाप्रमाणें अमेरिकेस चालू युद्धांतहि पडणें प्राप्त आहे अशी भाषा ऐकूं येऊं लागली आहे आणि दोस्त राष्ट्रांस अमेरिकेनें सहाय देण्याची आवश्यकता प्रतिपादली जात आहे. युरोपांतला आणीबाणीचा प्रसंग लक्षांत घेऊन अमेरिकन राष्ट्रानें निश्चयात्मक व धडाडीचें धोरण अंमलांत आणणें अगत्याचें झालें आहे. रशिया व जर्मनी ह्यांस शांततेचे संदेश अमेरिकेकडून अनेक वेळां गेले असतां त्यांचा काय उपयोग झाला हें प्रसिद्ध आहे. दोस्त राष्ट्रांस सहाय द्यावयाचें तें ऐनवेळेसच देण्यांत स्वारस्य आहे.

---

### युद्धपरिस्थिति गंभीर पण आटोक्यांत

जर्मनीनें बेल्जम व फ्रान्स ह्या देशांत घुसून त्वरेनें पुढें चाल करून जाण्याचा सपाटा चालवला आहे. जर्मन फौजा इतक्या त्वरित एका बाजूनें ब्रुसेल्स व अँटवर्पपर्यंत व दुसऱ्या बाजूनें सेडॉनच्या भागांत मुसंडी मारून जाऊं शकल्या आणि फ्रेंच मुलखांत त्यांस पाचर मारतां आली. ह्याचीं मुख्य दोन कारणें आहेत. एक तर हॉलंडमध्यें जर्मन सैन्यास कांहींच प्रतिकार झाला नाहीं आणि बेल्जमचा मुलूख एकाएकीं उघडा पडला आणि दुसरें जर्मन सेनानींनीं मकम चिलखती गाड्या व गोळे फेकणारीं लढाऊ विमानें ह्यांचा एकत्रित उपयोग केला आणि त्यांच्या मागें आपलें पायदळ मुलूख व्यापण्यास पाठवून दिलें. हजारों चिलखती गाड्या आणि विमानें ह्यांच्या गर्दीत चाल करण्याच्या जर्मनीच्या धोरणामुळें फ्रेंच सैन्यास थोडीशी माघार घ्यावी लागली आणि तीस अनुसरून ब्रिटिश व बेल्जम फौजांस व्यवस्थित रीतीनें मागें हटून आपली पुनर्रचना करावी लागली. ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चार्चिल, ह्यांनीं युद्धपरिस्थितीची वस्तुस्थितिनिदर्शक कल्पना एका भाषणांत परवां दिली. तसें करतांना वरील बाबींचा स्पष्ट उल्लेख त्यांनीं केला. जर्मन फौजा एका बाजूनें पॅरिसच्या व दुसऱ्या बाजूनें समुद्राच्या रोखानें चालल्या आहेत असें दिसून येतें. तथापि, विशिष्ट कारणामुळें जर्मन सैन्याची प्रगति प्रारंभीं त्वरित गतीनें झाली असली तरी ही चढाई सारखी चालूं शकत नाहीं, हें उघड आहे. ब्रिटिश लढाऊ विमानें जर्मन फौजांच्या पिछाडीवर वहातुकीच्या साधनांवर गोळे फेंकून त्यांचा नाश करीत आहेत. जर्मन चिलखती गाड्यांची बरीच हानि झाली असून जर्मन फौजांचा युद्धसामुग्रीचा पुरवठा सारखा टिकूं शकत नाहीं. फ्रेंच सरकारनें निकरानें लढून शत्रूचे हल्ले परतवण्याचें आणि त्यावर स्वतःचे हल्ले चढवण्याचें ठरवलें आहे आणि ब्रिटिश सरकारचा त्यास पूर्ण पाठिंबा आहे. परिस्थिती गंभीर आहे त्यांत वाद नाहीं आणि ही गोष्ट इंग्लंड व फ्रान्स या देशांच्या जनतेस स्पष्ट कळणें जरूर आहे.

तर्से ज्ञान झाल्यावांचून दोस्त राष्ट्रांच्या हातून विजय मिळण्याची शिकस्त होणार नाहीं, ह्या जाणीवेनें ब्रिटिश व फ्रेंच प्रधानांनीं वस्तुस्थिति गंभीरपणानें आपल्या लोकांपुढें मांडली आहे आणि तिच्यामधून बाहेर निघून शत्रूस मागें हटवण्याचा आपला दृढनिश्चय जाहीर केला आहे. सामान्य जनतेमध्यें भलत्या अपेक्षा पसरणें अनिष्ट आहे त्याप्रमाणेंच अनुत्साह आणि निराशा ह्यांचें वातावरण निर्माण होणेंहि घातुक आहे. ह्या दुहेरी दृष्टीनें मि. चर्चिल व मि. रेनो ह्यांनीं घोषणा केल्या आहेत, हें सर्वथा योग्य आहे.

---

## सर्वपक्षीय एकीकरणाची आवश्यकता

राजकीय आणि सामाजिक पक्षभेद सामान्यतः इतके तीव्र असतात कीं, सबंद राष्ट्रावर संकट आलें असतांनाहि त्यास एकविचारानें तोंड देण्याची लोकांची तयारी नसते. रशियासारख्या कम्युनिस्टांच्या किंवा जर्मनी व इटली ह्यांच्यासारख्या फॅसिस्टांच्या देशांत एकमुखी राष्ट्रीय धोरण आखतां येऊन सर्व लोकांचें सहकार्य पूर्णपणें होत असल्याचा देखावा करतां येतो. विशेषतः लोकशाही व व्यक्तिस्वातंत्र्य ह्यांचें प्राबल्य जेथें असतें तेथें एकछत्री समाजव्यवस्था अशक्यप्राय होते. सध्या युद्धाचें संकट इतकें भयंकर आहे कीं, त्याचे बाबतींत करावयाच्या गोष्टींत जनतेची एकवाक्यता व जूट हीं अगत्याचीं अशीं आहेत, हें सांगावयास नको. हिंदुस्थानांतील राजकारणांत गेले आठ महिने मतामतांचा गलबला माजून राहिला असून निरनिराळे पक्ष एकाच व्यासपीठावर येऊं शकले नाहींत. बेल्जम व फ्रान्स ह्या देशांत शत्रूनें धुमाकूळ माजवला आहे आणि हिटलरशाहीचें आक्रमण स्वतंत्र देशांत बेदरकार चाललें आहे त्याचा प्रतिकार हिंदुस्थानच्या व एकूण मानवी हिताच्या दृष्टीनें होणें अगत्याचें आहे ह्याविषयीं मतभेद नाहीं. तरीहि सामान्य ध्येय गाठण्यासाठी एकत्र येण्याचें महत्त्व पुढाऱ्यांस कळतें पण वळत नाहीं असा प्रकार झाला आहे. इंग्लंडमध्यें प्रधान मंडळाची पुनर्घटना झाल्याकारणानें तेथील निरनिराळे राजकीय पक्ष एकाच व्यासपीठावर येण्याची शक्यता आतां उत्पन्न झाली आहे. पण तत्पूर्वी प्रधानमंडळाच्या युद्धविषयक धोरणास पाठिंबा देण्यास लिबरल आणि मजूर पक्षाचे पुढारी पुढें येत नसत आणि कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाच्या त्या हेतूनें भरवण्यांत येणाऱ्या सभांत भाग घेत नसत. ब्रिटिश प्रसिद्धी खात्याच्या प्रयत्नास शेवटीं यश येऊन हा बहिष्कार पुष्कळ अंशांनीं दूर करण्याचें ठरलें. युद्ध यशस्वी करण्याच्या उद्देशानें प्रचारार्थ भरलेल्या सभांस मंत्रिमंडळांतील पुढाऱ्यांच्या बरोबरीनें आपण भाग घेतल्यास सरकारच्या सर्व कार्यक्रमास आणि धोरणास आपल्या पक्षाचा पाठिंबा आहे असा गैरसमज जनतेमध्यें पसरेल असें लिबरल व कामकरी पक्षाच्या पुढाऱ्यांचें म्हणणें असे. ही अडचण दूर करण्यासाठी एक युक्ति काढण्यांत आली. जाहीर सभांत मुख्य वक्ता कोणत्या तरी पक्षाचा एखादा पुढारी असावयाचा आणि त्याच्याबरोबर इतर पक्षाच्या दुय्यम पुढाऱ्यांनीं बसून आभारप्रदर्शनाचें वगैरे किरकोळ काम करावयाचें अशी ही सहकार्याची योजना होती. आतां सर्वपक्षीय मंत्रिमंडळ स्थापन झाल्यामुळें असल्या उपायांची आवश्यकता उरली नाहीं. तथापि राष्ट्रीय ध्येयाच्या सिध्यर्थ सर्व पक्षांच्या लोकांस विशिष्ट मर्यादेंत एकाच व्यासपीठावर आणण्याचा वर सांगितलेला प्रयत्न विचार करण्यासारखा व अनुकरणीय आहे, ह्यांत संशय नाहीं. इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानांतहि एकीकरणाची व सर्वपक्षीय सहकार्याची आवश्यकता उत्पन्न झालेली नाहीं असें कोण म्हणेल !

## जागतिक सोन्याचें उत्खनन वाढलें

सोन्याचें जागतिक उत्खनन १९३९ सालांत ३ कोटि, ९१ लक्ष औंस इतकें झालें. १९३८ सालाच्या मानानें हा आकडा २१ लक्ष, २२ हजार औंसांनीं अधिक आहे. गेल्या चार वर्षांतलें सोन्याचें एकूण उत्खनन १४ कोटि ४० लक्ष औंस भरलें. १९३२ ते १९३५ ह्या चार वर्षांचा आकडा १० कोटि, ६५ लक्ष औंस असा होता. ह्या आकड्यांवरून जगांतला सोन्याचा पुरवठा कसा सारखा वाढत चालला आहे हें दिसून येतें. १९३१ व १९३९ ह्या दोन सालांची तुलना केली असतां आणखी एक महत्त्वाची गोष्ट निदर्शनास येते ती ही कीं दक्षिण आफ्रिकेंतील सोन्याच्या खाणींचें उत्पादन वाढलें असलें तरी एकूण जागतिक उत्खननांतल्या त्या देशाच्या भागाचें प्रमाण कमी झालें आहे. १९३१ मध्यें जागतिक उत्खननाचा आकडा २ कोटि, २४ लक्ष औंस असा होता. त्याच्या ७० टक्यांइतका अंश ब्रिटिश साम्राज्यांतील खाणींच्या उत्पादनाचा होता आणि त्याच्या ७० टक्यांइतका म्हणजे सुमारे १½ कोटि औंसांपैकीं १ कोटि औंस इतका भाग दक्षिण आफ्रिकेच्या वांट्याचा होता. आतां १९३९ हें वर्ष घ्या. त्या सालचें जागतिक उत्पादन ३ कोटि, ९१ लक्ष औंस भरलें असें वर सांगितलेंच आहे. १९३१ सालच्या मानानें हा आंकडा ७५ टक्के वाढ दर्शवतो. १९३९ मध्यें साम्राज्यांतलें उत्खनन २ कोटि, २३ लक्ष औंस झालें, म्हणजे १९३१ च्या जागतिक उत्पादनाइतकें भरलें. परंतु ह्यांतला दक्षिण आफ्रिकेचा अंश १९ लक्ष, ४२ हजार औंस एवढाच होता. हें प्रमाण एक–नवमांश इतकेंच काय तें पडतें. जागतिक आणि साम्राज्यांतर्गत उत्पादनांतला दक्षिण आफ्रिकेच्या उत्खननाचा अंश पुष्कळ कमी झालेला दिसतो. कॅनडांतल्या सोन्याच्या खाणींचें उत्पादन वाढत आहे हें ह्या परिस्थितीचें कारण आहे. अमेरिकन राष्ट्रांतलेंहि उत्खनन वाढत्या प्रमाणावर आहे.

---

## "भोपटकर गुणगौरव ग्रंथ"

श्री. अण्णासाहेब भोपटकर ह्यांच्या षष्ठ्यब्दिपूर्तीच्या प्रसंगानें केसरी–मराठा संस्थेनें हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. श्री. अण्णासाहेबांच्या जीवनाच्या निरनिराळ्या अंगांवर प्रकाश पाडणारे असे सुमारें तीस लेख त्यांत आहेत. त्यांच्या भरदार चारित्र्याचीं वैशिष्ट्यें ह्या सर्व लिखाणांत उठावदार रीतीनें प्रकट करण्यांत आलीं आहेत. त्यांची चौरस बुद्धि, धडाडी, विविध प्रकारची सार्वजनिक कामगिरी, स्वार्थत्यागाची वृत्ति, औदार्य इत्यादि गुण ग्रंथांत उत्कृष्टपणानें प्रतीत होतात. श्री. तात्यासाहेब करंदीकरांनीं लिहिलेली प्रस्तावना अत्यंत सूचक आणि उद्बोधक आहे.

## "न्यायबोध"

"न्यायबोध" मासिकाच्या मे महिन्याच्या अंकांत कायद्याच्या अनेक मुद्यांचें विवेचन आलें असून त्यांतली माहिती धंदेवाल्या व सामान्य वाचकांस उद्बोधक होईल अशी आहे. वतनाचा कायदा आणि मुंबई प्रांतांतील कुळांच्या संरक्षणाचा कायदा हीं दोन महत्त्वाचीं प्रकरणें प्रस्तुत अंकांत चालू करण्यांत आलीं आहेत. मुंबई प्रांतांतील वतन ॲक्टाबाबत प्रश्नाचा खुलासाहि त्यांत आहे. निरनिराळ्या हायकोर्टांचे निवडक विषयांवरील निकाल सुबोध रीतीनें स्पष्ट करण्यांत आले आहेत, ते वाचनीय आहेत.

## रिडीमेबल प्रेफरन्स शेअर्स

कंपन्यांच्या भागभांडवलांत निरनिराळ्या प्रकारचे भाग असू शकतात. रिडीमेबल प्रेफरन्स भाग हा या अनेक प्रकारांतील एक प्रकार आहे.

रिडीमेबल प्रेफरन्स भाग खरेदी करणें म्हणजे लांब मुदतीची ठेव ठेवण्यासारखें असून त्या भागांत गुंतविलेली रकमं कांहीं मुदतीनंतर परत मिळतेच अशी बऱ्याच लोकांची समजूत असते. या समजुतींत सत्यांश असला तरी ती संपूर्णपणें बरोबर नाहीं.

ज्या कंपन्या रिडीमेबल प्रेफरन्स भाग विक्रीस काढतात त्या सर्वसाधारणपणें ५, १० किंवा १५ वर्षांनीं अगर त्यानंतर कंपनीला योग्य वाटेल तेव्हां रिडीमेबल प्रेफरन्स भागाची रकम परत करण्यांत येईल असें जाहीर करतात. अशा अर्थाची व्यवस्था कंपनीच्या आर्टिकलसमध्यें असते. परंतु रकम परत करण्याचा अधिकार कंपनीचा असून मागण्याचा अधिकार भागवाल्यांना नसतो ही गोष्ट सर्वसाधारण लोक विसरतात. म्हणजेच वरील भागांची रकम कांहीं वर्षांची ठेव समजावयाची कीं कायम भागभांडवल समजावयाची हें कंपनीनें ठरवावयाचें असतें; भाग खरेदी करणारांनीं नाहीं.

कंपनीच्या नफ्यांतून नवीन भाग काढून किंवा कंपनीची मालमत्ता विकून त्यांतूनच रिडीमेबल प्रेफरन्स भाग भांडवल परत द्यावें अशी कंपन्यांच्या कायद्यानें व्यवस्था केली आहे. भागाच्या सर्व रकमेचा भरणा झाल्याखेरीज कंपनीस भाग रकम परत देतां येत नाहीं. तसेंच, जेव्हां कंपनी नफ्यांतून किंवा मालमत्ता विकून रिडीमेबल प्रेफरन्स भागांची रकम परत देते तेव्हां एकूण तेवढीच रकम कंपनीच्या नफ्यांतून बाजूस "कॅपिटल रिडेंम्शन रिझर्व्ह फंड" म्हणून कंपनीस ठेवावी लागते.

जेव्हां वरील रकम नवीन भाग काढून परत करण्यांत येते तेव्हां मूळ विक्रीच्या किंमतीहून अधिक असलेली रिडीमेबल प्रेफरन्स भागांची रकम कंपनीच्या नफ्यांतूनच आली पाहिजे. कंपनीचा प्रत्येक १०० रुपयांचा रिडीमेबल प्रेफरन्स भाग जर ११० रुपये देऊन परत करावयाचा असेल तर प्रत्येक भागामागें कंपनीला १० रुपये नफ्यांतून द्यावे लागतील. रिडीमेबल प्रेफरन्स भाग घेण्यापूर्वी कंपनीच्या त्याबाबत अधिकाराबद्दल व कंपनीच्या व्यवस्थेबद्दल वरील माहिती प्रत्येकास असणें आवश्यक आहे.

### हिंदी कारखाने व त्यांतील कामगार

| | १९३७ | १९३८ |
|---|---|---|
| नोंदलेले कारखाने | ९,८९३ | १०,७८२ |
| चालू असलेले कारखाने | ८,९३३ | ९,७४३ |
| कामगारांची संख्या | १७,३८,००० | १६,७६,००० |
| कपास कापडाच्या धंद्यांतील कामगार | ४,७४,००० | ५,१२,००० |
| तागाच्या धंद्यांतील कामगार | २,९५,००० | ३,०६,००० |
| कामकरी मुलांची संख्या | १०,८३३ | १०,७४२ |
| स्त्री कामगार | २,३२,००० | २,४१,००० |


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना—७ सप्टेंबर १९०६ ]

उभारलेलें भांडवल ... ... ... रु. ३,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,१३,००,०००

मुख्य कचेरी—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

शाखा—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रे ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी, ( मुंबई ), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, चौरंघी स्क्वेअर ब्रँच, पुणें, पुणें-शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ), जमशेदपूर

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

चालू ठेवींवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवींवर शेकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवींवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रकम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय,ट्रस्टी, या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तीं सुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट—टी. आर. लालवाणी.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

लक्ष्मीरोड, पुणें शहर.

अधिकृत भांडवल.......रु. १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल ...रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल.......रु. ३,१२,०००
वसूल झालेलें भांडवल...रु. १,५६,०००

शाखा

अेक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

डायरेक्टर्स

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन; श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढतां येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम. व्ही. गोखले, मॅनेजर.

## एक्सचेंज बँकांच्या अध्यक्षांचीं गेल्या वार्षिक सभेंतील भाषणें

### नॅशनल बँकेच्या अध्यक्षांचें भाषण

"कलकत्ता शेअर बाजारांतील आजची तागाच्या शेअरची भरमसाट किंमत अनिष्ट असून परिणामीं धंद्यास हानिकारक आहे," असे उद्गार नॅशनल बँक ऑफ इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष मि. लँगफर्ड जेम्स यांनीं बँकेच्या वार्षिक सभेंत काढले.ते पुढें म्हणाले: "तागाच्या धंद्यास सुस्थिति आणण्याचे जूट मिल असोसिएशनचे प्रयत्न यशस्वी होत असतांना युद्ध सुरू होऊन हिंदुस्थान सरकारनें नव्वद कोटी गोणाच्या पोत्यांची मागणी केली. सहाजिकच धंद्याला तेजी आली. सरकारची मागणी केवळ उत्पादन किंमत घेऊन पुरविण्यांत आली. कांहीं करार तर तोटा सोसून करण्यांत आले.

"कापडाचा धंदा अधिकाधिक हिंदी लोकांचा होत असून लँकाशायरला त्याचें पूर्वीचें महत्त्व कधींहि येणें शक्य नाहीं. चहाच्या धंद्याचें जागतिक नियंत्रण गेलीं आठ वर्षें असून तें यशस्वी ठरलें आहे. युद्ध सुरू झाल्याबरोबर सरकार व चहाच्या मळ्याचे मालक यांच्यांत करार झाला असून युद्ध संपेपर्यंतचा करार लवकरच होईल. बाजारांतील चहाची किंमत गिऱ्हाइकांना परवडेल अशी राहील अशीच करारांत व्यवस्था करण्यांत आली आहे. सरकारनें चावयाची किंमत वरील किंमतीवर ठरविण्यांत आली आहे.

"रबराच्या एकंदर उत्पादनाच्या ५०% उत्पादन ब्रिटिश साम्राज्यांत होतें तर जागतिक एकूण विनियोगापैकी फक्त १०% चा विनियोग तेथें होतो. ह्यामुळें हुंडणावळींत रबराला महत्त्वाचें स्थान निर्माण झालें आहे. साखरेचा धंदा हिंदी धंद्यांत महत्त्वाचा असून साखरेच्या किंमतीपैकीं मोठा भाग शेतकऱ्यास मिळतो."

### मर्कन्टाइल बँकेच्या अध्यक्षांचें भाषण

ह्या बँकेच्या वार्षिक सभेच्या प्रसंगीं तिच्या अध्यक्षांनीं युद्धाचा एकंदर व्यापारावर झालेल्या परिणामांचा उल्लेख केला. ते म्हणाले:— "युद्धकाळांत परराष्ट्रीय हुंडणावळीचा व्यवहार करण्याकरितां ब्रिटिश सरकारनें बँकेची नेमणूक केली.परंतु त्याबाबतचे नियम इतके क्लिष्ट होते कीं, ते समजून त्याप्रमाणें व्यवहार करणें कठीण झालें. हळुहळु नियम सोपे करण्यांत आले व बँकेच्या अधिकाऱ्यांना अनुभवहि आला. आतां हुंडणावळीचा व्यवहार फारसा अवघड राहिलेला नाहीं. युद्ध एकाएकी सुरू झाल्यामुळें जर्मन मालाचीं बऱ्याच मोठ्या रकमांचीं बिलें येणें राहिलीं. परंतु मागच्या युद्धाच्या अनुभवाचा फायदा होऊन बँकेच्या अधिकाऱ्यांनीं "शत्रू कर्जखातें" प्रस्तुत युद्ध सुरू झाल्याबरोबर उघडलें. याचा उपयोग होऊन बहुतेक सर्व माल सोडविण्यांत आला असून त्यांचीं बिलें वसूल झालीं आहेत. राहिलेल्या मालासंबंधीं लंडन चेंबर ऑफ कॉमर्स विचारविनिमय करीत आहे. ब्रिटिश सरकारनें प्राप्तीवरील कर वाढविल्यापासून प्रेफरन्स भागवाल्यांचें किंचित नुकसान झालें आहे. त्यांच्या डिव्हिडंडवर कर जास्त पडतो.

"आयात–निर्यात जहाजांची वहातुक आणि परराष्ट्रीय हुंडणावळ सरकारनियंत्रित असून चहा, गोणपाट यांसारख्या पदार्थांची खरेदी ब्रिटिश सरकार मोठ्या प्रमाणावर करीत आहे. तसेंच हिंदुस्थानांत खरेदी केलेल्या मालाची किंमत बँक ऑफ इंग्लंड व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेमार्फत दिली जाते. वरील दोन गोष्टी एक्सचेंज बँकांच्या व्यवहारावर परिणाम करणाऱ्या आहेत. युरोपांत युद्ध चालू असल्यामुळें तिकडे पाठवावयाच्या मालाचा अधिक रकमेचा विमा उतरावा लागतो. हें टाळण्यासाठीं मलायांतील टिन व रबर परस्पर अमेरिकेकडे पाठविण्यांत येत आहे. युद्धामुळें किंमती चढल्या आहेत. त्याचा फायदा मलायांतील रबर, सीलोनमधील चहा व रबर, आणि हिंदुस्थानांतील तागाचा धंद्यांस मिळत आहे. त्याबरोबरच मळ्यांत खपणारे शेतकरी व गिरण्यांत काम करणारे कामगार यांच्यांत वाढत्या रहाणीच्या खर्चामुळें असंतोष उत्पन्न झाला आहे. हिंदुस्थानचा निर्गत व्यापार वाढत आहे. हिंदी शेतकऱ्याचा त्याच्या मालाला चांगली किंमत येत असल्यामुळें त्याचा फायदा आहे. युद्धामुळें हिंदी धंद्यांस उत्तेजन मिळत आहे. युद्धाबरोबर आलेली भरभराट त्याच्या बरोबरच जाणारी असून त्यानंतर जागतिक मंदी येण्याचा संभव आहे, त्याची व्यवस्था आतांपासूनच करावयास हवी."

BHARAT
Insurance Co., Ltd.
COMPLETES IN 1939
SOLID, SOUND, FRESH BUSINESS of
OVER RUPEES
2 CRORES 8 LAKHS
UNIVERSALLY RECOGNISED AS
A Leader among Indian Life Offices
Previous rates of Bonus maintained as a result of the valuation
RS. 22-8 for Whole-Life Policies
for the quinquennium ended 31st Dec. 1938
RS. 17-8 for Endowment Policies
Chairman: SETH RAM KRISHNA DALMIA
Director-in-Charge: RAJENDRA KUMAR JAIN
BRANCHES
Agra, Ahmedabad, Ajmer, Allahabad, Ambala, Amritsar, Asansol
Bangalore, Barisal, Bombay, Calcutta, Colombo (Ceylon), Dacca, Dehra Dun
Delhi, Ernakulam, Gauhati, Indore, Jalpaiguri, Jammu, Karachi
Lahore, Lucknow, Madras, Madura, Multan, Muzaffarpur, Nairobi (E. Africa)
Nagpur, Najibabad, Patna, Peshawar, Poona, Rajmundry, Rangoon (Burma)
Rawalpindi, Secunderabad, Shillong, Sialkot, Sukkur, Surat, Karwar
Head Office: LAHORE

## जामिनकीबाबत एक निवाडा

कंपनीकडील कर्जाबद्दल मॅनेजिंग एजंटनें हमी घेतली व कंपनी ॲक्टाअन्वयें कंपनीच्या पुनर्घटनेच्या योजनेनुसार सावकारानें कंपनीकडून निम्मी रक्कम रोख घेतली. बाकी रकमेबद्दल सावकाराचा जामिनदारावर हक्क राहातो काय ? जामिनदार हिंदु एकत्र कुटुंबाचा पुढारी आहे. अशा जामिनकीचें कर्ज कुटुंबांतील इतर सहभागिदारांवर बंधनकारक आहे काय ? हे मुद्दे खालील विवेचनांत आले आहेत.

हकीकतः—वादी जगन्नाथ गणेशराम आगरवाला हा भागीरथ मिलचा एक डायरेक्टर होता. प्रतिवादीचा बाप सदर्हू मिलचा मॅनेजिंग एजंट होता. ता. ४-१२-३० रोजीं प्रतिवादीचा बाप मयत झाल्यावर प्रतिवादीचे तिघे भाऊ यांच्या कुटुंबाच्या पेढीची मॅनेजिंग एजंट म्हणून नेमणूक झाली. वादीनें कंपनीला कर्ज दिलें होतें व कंपनीची स्थिती डबघाईला आल्यामुळें वादीनें तगादा सुरू केला. ता. १७-१-३१ रोजीं प्रतिवादी नं. १ शिवनारायण यानें कुटुंबाचा पुढारी म्हणून वादीस पत्र लिहिलें कीं, " भागीरथ मिलकडे ३३ हजार रुपये व व्याज असें तुमचें घेणें आहे. ती रक्कम मिलकडून देण्याची आम्ही व्यवस्था करीत आहों. त्याबद्दल काळजी नसावी. तुम्ही फिर्याद वगैरे करूं नये. मिलकडून रकम न मिळाल्यास आम्ही स्वतः तुमची रकम व्याजासह देण्याची जबाबदारी घेतो. " यानंतर कंपनी जास्तच अडचणींत येऊन तिचा कारभार बंद करण्याबद्दल कोर्टाकडे अर्ज झाला, त्यांत ता. ११-१-३५ रोजीं कोर्टानें एक तडजोडीची योजना मंजूर केली कीं, सर्व सावकारांना निम्मी रक्कम रोख देण्यांत यावी व निम्म्या रकमेइतके प्रेफरन्स शेअर देण्यांत यावे. ही योजना मंजूर होण्यापूर्वीं वादीनें प्रतिवादीस कळविलें कीं, ' निम्म्या रकमेचे प्रेफरन्स घेण्यास आपण कबूल नाहीं व सदर्हू निम्म्या रकमेबद्दल तुमचेकडे तुम्ही दिलेल्या हमीप्रमाणें आम्ही मागणी करूं. ' ता. २८-६-३२ रोजीं वादीनें प्रतिवादीस नोटीसीनें हेंच कळविलें कीं, ' त्यांनीं दिलेल्या हमीप्रमाणें आपल्यास असलेल्या हक्कांस बाध न येतां, योजनेप्रमाणें निम्मी रक्कम आपण घेऊं. ' ता. २-७-३२ रोजीं वादीला कंपनीकडून निम्मे रुपये रोख मिळाले व बाकी निम्म्या रकमेबद्दल प्रेफरन्स शेअर्सचें सर्टिफिकेट मिळालें. ता. १९-१-३४ रोजीं वादीनें तिघां भावांवर रु. १३६१४ चा दावा आणला व आपणांस मिळालेले प्रेफरन्स शेअर्स सदर्हू रकमेकरितां प्रतिवादीस देण्यास आपण तयार असल्याचें कळविलें. पहिल्या कोर्टानें निकाल दिला कीं, वादीनें कंपनीच्या योजनेप्रमाणें रोख रक्कम व शेअर स्वीकारल्यामुळें प्रतिवादी नं. १ नें घेतलेली जामिनकीची जबाबदारी संपते. तसेच प्रतिवादी नं. २, ३ हे अशा जामिनकीच्या कर्जाला कोणत्याहि रीतीनें जबाबदार होऊं शकत नाहींत, कारण कोणत्याहि कायदेशीर गरजेकरितां अगर कुटुंबाच्या फायद्याकरितां प्रतिवादी नं. १ नें सदर्हू जामिनकी स्वीकारली नव्हती. वादीनें या निकालावर हायकोर्टाकडे अपील केलें.

मुद्दे व विवेचनः—मिल कंपनीच्या योजनेप्रमाणें वादीनें मिलकडून निम्मे रुपये रोख घेतले व निम्म्या रकमेचे शेअर्स घेतले, यामुळें प्रतिवादी नं. १ हा ता. १७-१-१९३१ च्या पत्रानें स्वीकारलेल्या जामिनकींतून मुक्त होतो कीं काय, एवढाच मुद्याचा प्रश्न आहे. प्रतिवादी नं. १ नें आणखीहि कित्येक सावकारांस अशीं पत्रें लिहिलीं आहेत. याबद्दल विलायतेंतील निवाड्यांचा स्पष्ट निष्कर्ष आहे कीं, एकाद्या कंपनीचा कारभार कायद्यानें बंद केल्यानें अथवा कंपनीच्या कर्जफेडीची योजना ठरविल्यानें जामिनदारांवरील जबाबदारी नाहींशी होत नाहीं; जामिनदारांची जबाबदारी कायम रहाते, असा उल्लेख कंपनीच्या पुनर्घटनेच्या योजनेंत करणें आवश्यक असल्यामुळें तो तसा केला जात नाहीं. मूळ ऋणकोवर कर्ज फेडण्याची जितक्या मर्यादेपर्यंत जबाबदारी असते, तितक्याच मर्यादेपर्यंत ती जबाबदारी जामिनदारावरहि असते, म्हणजे दोघेहि सारख्याच अंशानें त्या कर्जास जबाबदार असतात. मूळ ऋणकोकडून कर्ज वसूल न होईल तरच विकल्पेंकरून जामिनदार जबाबदार होतो. अशा स्वरूपाची ही वैकल्पिक जबाबदारी नसते. एकाच वेळीं दोघेहि सावकारास पूर्णांशानें जबाबदार असतात. मूळ ऋणको व जामिनदार दोघेहि कर्जास समाईकपणें व स्वतंत्रपणेंहि जबाबदार असतात. सबब एकदां मिळकडून वादीनें रकम वसूल केल्यावर पुनः जामिनदाराकडूनहि त्यांस वसुली करूं दिल्यानें तेंच कर्ज दुहेरी रीतीनें दुप्पट वसूल केलें जाण्याचा धोका आहे, ही कनिष्ट कोर्टाची विचारसरणी बरोबर नाहीं. मॅनेजिंग एजंटचें काम प्रतिवादीकडे आनुवंशिक धंदा म्हणून आलें असलें तरी ता. १७-१-३१ च्या पत्रानें प्रतिवादी नं. १ नें स्वीकारलेली जामिनकी प्रतिवादी नं. २-३ यांच्या एकत्र कुटुंबांतील हिश्श्यावर कोणत्याहि रीतीनें बंधनकारक होऊं शकत नाहीं. प्रतिवादी नं. १ नें अशा रीतीनें जामिनकी स्वीकारण्यास कोणतेही कायदेशीर गरजेचें कारण नव्हतें. इतर कांहीं सावकारांस प्रतिवादी नं. १ नें अशींच जामिनकीचीं पत्रें याच सुमारास लिहिलीं होतीं. यावरून एकत्र कुटुंबाच्या नित्य व्यवहारांतील क्रम म्हणून हीं जामिनकी होती, असें सिद्ध होत नाहीं. कंपनीच्या कारभारासाठीं लोकांकडून ठेवीच्या रूपानें रकमा आणून त्या कंपनीस देणें मॅनेजिंग एजंटचें काम होतें, परंतु त्या ठेवी परत देण्याची अंगित जबाबदारी आपण स्वतः स्वीकारण्यास मॅनेजिंग एजंट कायद्यानें मुळींच बांधलेले नव्हते. अशा स्थितींत अशा जामिनकीच्या कर्जाबद्दल एकत्र कुटुंबांतील इतर इसम अगर त्यांचा इस्टेटींतील हिस्सा जबाबदार होऊं शकत नाहीं.

निकालः—प्रतिवादी नं. १ विरुद्ध कनिष्ठ कोर्टानें दावा रद्द केला होता. तो निकाल फिरवून जामिनदार म्हणून प्रतिवादी नं. १ वर वादीस हुकूमनामा देवविण्यांत आला. मात्र सदर्हू दाव्याच्या रकमेऐवजीं वादीला कंपनीकडून जे शेअर्स मिळाले होते ते शेअर्स वादीनें प्रतिवादी नं. १ चे नांवानें मिळाले अगर प्रतिवादी नं. १ सांगेल त्या इसमाचे नांवानें लेखी करून दिले पाहिजेत असा हुकूम केला.

सारांशः—एखाद्या कर्जाबद्दल जामिनकी अगर हमी (गॅरंटी) घेणारा इसम त्या कर्जाच्या फेडीकरितां मूळ ऋणकोइतकाच कायद्यानें पूर्णपणें जबाबदार ठरतो. मूळ ऋणकोकडून सावकारानें कांहीं रक्कम वसूल घेतली तरी बाकी रकमेबद्दल जामिनदाराची स्वतंत्र जबाबदारी शिल्लक राहतेच. अशी जामिनकी एकत्र कुटुंबाच्या कोणत्याही कायदेशीर गरजेकरितां घेतली नसेल तर तें कर्ज जामिनदाराखेरीज एकत्रांतील इतर इसमांवर अगर त्यांच्या इस्टेटीवर बंधनकारक होऊं शकत नाहीं.

" न्यायबोध " वरून

## मुंबई प्रांताचें आरोग्य

मुंबई शहर व प्रांतरें म्युनिसिपल प्रदेशं यांत एन्टेरिक तापाचा (ऑक्झ्रसचा) उद्भव व फैलाव कां होतो या विषयींच्या कारणांसंबंधीं चौकशी करण्यास सन १९३८ च्या जून महिन्यांत सुरुवात झाली. ज्या कारणांमुळें तापाचा फैलाव होणें संभवतें तीं कारणें म्हणजे पिण्याचें पाणी, ड्रेनेज (सांडपाणी वगैरे वाहून नेण्याची व्यवस्था), दूध व इतर खाद्य पदार्थ, उदाहरणार्थ आइसक्रीम, बर्फ वगैरे तसेंच संसर्गदूषित व जंतुवाहक पदार्थ वगैरे. ह्या सर्वांची शक्य त्या त्या वेळीं तपासणी करण्यांत आली. (रोगांच्या कारणांचा) शोध लावण्याकरितां, तसेंच रोगाचें निदान ठरविण्याकरितां मुंबईच्या हाफकिन इन्स्टिट्यूटची मदत घेण्यांत आली. सदरहू तपास अद्याप चालू आहे.

म्युनिसिपल प्रदेशांत कराचा दर माणशीं आकार रु. ५-१०-६ इतका होता व सार्वजनिक आरोग्याप्रीत्यर्थ उपायांसाठी होणारा खर्च दर माणशीं सरासरी रु. २-१-११ होता. लोकलबोर्डाचें एकूण उत्पन्न रु. १,६९,७६,६४८ इतकें होतें, त्यांपैकीं रु. ८,०८,८०२ सार्वजनिक 'आरोग्यासंबंधीं कामें' या सदराखाली खर्च करण्यांत आले.

धी बॉम्बे प्रेसिडन्सी बेबी अँड हेल्थ वीक असोसिएशन, धी लेडी विल्सन व्हिलेज मॅटर्निटी असोसिएशन, धी बॉंबे प्रेसिडेन्सी इन्फंट वेलफेअर सोसायटी व धी बॉंबे मोफसिल मॅटर्निटी, चाइल्ड वेलफेअर अँड हेल्थ कौन्सिल यांनीं बाळंतपणासंबंधीं व शिशुसंगोपनासंबंधीं या वर्षी महत्त्वाची कामगिरी करण्याचें चालू ठेविलें होतें.

खाद्य पदार्थांत भेसळ करण्याचा प्रघात वाढत आहे व हल्ली खेडेगांवांतहि तो पसरत चालला आहे, अशी वस्तुस्थिति आहे तरीसुद्धा फक्त चारच म्युनिसिपालिट्यांनीं म्हणजे मुंबई, अहमदाबाद, सुरत व भडोच या म्युनिसिपालिट्यांनीं पदार्थांत भेसळ करण्यास प्रतिबंध करण्याबाबतचा कायदा आपापल्या प्रदेशांत लागू केला आहे. सोलापूर, धुळें, अंमळनेर, बेळगांव, अहमदनगर व भुसावळ येथील म्युनिसिपालिट्यांनीं तो कायदा लवकरच लागू करण्याचें ठरविलें आहे. ज्या शहरांत हा आक्ट अंमलांत आहे अशा मुंबईखेरीज करून इतर शहरांत सन १९३८ सालीं खाद्य पदार्थांच्या २,६१८ नमुन्यांचें पृथक्करण करण्यांत आलें; व या वर्षी तुपाच्या नमुन्यांपैकी शेकडा ४७ नमुने भेसळीचे निघाले तर १९३७ मध्यें शेकडा ५४ भेसळीचे निघाले होते, व त्या वर्षी दुधाच्या नमुन्यांपैकी शेकडा ४८ भसळीचे निघाले, तर मागील सालीं शेकडा ५७ भेसळीचे निघाले.

---

### कॉफी

कॉफीचें झाड आबीसिनियांत रानटी स्थितींत वाढतें. त्याचें मूलस्थान अरबस्तान होय. तेथून डच लोकांनीं तें जावामध्यें आणि इंग्रजांनीं जमेकामध्यें नेलें. पुढें तें दक्षिण अमेरिकेंत गेलें. आजमितीस सबंध जगास पुरेल इतकी कॉफी एकट्या ब्राझिल देशांत तयार होते. १९२१ ते १९२८ ह्या वर्षांच्या अवधींत ब्राझीलच्या सरकारनें ८३ कोटि सेंटेल (१ सेंटेल = १०० पौंड) वजनाची कॉफी विकत घेऊन समुद्रांत फेकून दिली. पुरवठा कमी करून कॉफीची किंमत वाढवणें हा या कृत्याचा हेतु होता. अलीकडे फुकट जाणाऱ्या कॉफींत डांबर मिसळून तिचें सरपण तयार करतात. चहाप्रमाणेंच कॉफीमध्यें पोषक असे द्रव्य नाहीं.


पूर्व खानदेश
# सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.
जळगांव.
(स्थापना : मे १९१६)

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. ...... | १०,००,०००।– |
| जमा झालेलें शेअर भांडवल...... | ४,९९,०००।– |
| रिझर्व्ह फंड. ...... | २,९८,०००।– |
| इतर फंड्स. ...... | ३,७७,०००।– |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) ...... | ५७,८९,०००।– |

डिव्हिडंड पांच टक्के (सहा वर्षांपासून)

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—
मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवीवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवीवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

बी. डी. देशमुख,
चेअरमन.

# बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.
किं. १ रु. ८ आणे
१ रु. १० आ. ९ पै ची तिकिटें पाठवून मागणी करा.
: लेखक :
प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे
बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें
अत्यंत उपयुक्त पुस्तक
"अर्थ" ग्रन्थमाला, : : पुणें ४.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ३% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १११—२ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०५—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ८९—८ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०१—० |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९२—० |
| २½% १९४८–५२ ... ... ... | ९६—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०३—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०२—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... .. | १०९—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | ११९—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा भरलेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १३७—० |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% ... ... | ९९—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% ... | ३४—८ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १४८५—० |
| बॉंबे मॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १००–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | १२८—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २०६–१४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | ११३०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १०९५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% ... ... | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज ( ५०० ) १२½% | ९९२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७७०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २१३—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४७—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | ११—० |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३८—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४३८०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०८–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १४१—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३५७—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १८८२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु ... | ११६—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३५—३—० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६३—१—० |


स्पृहणीय यश

बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स

कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.


रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे

★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें

सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठी जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.

| रजिस्टर्ड ऑफिस : | बिझिनेस ऑफिस : |
|---|---|
| ७५४ शुक्रवार, पुणें १ | ९९१A सदाशिव, पुणें २ |

न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एससी.




स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )
२५।३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.




एजंटः—
**महादेव गोविंद कुलकर्णी**
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

---

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स अ‍ॅकेडिमी,** ६७२ सदाशिव, पुणें.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

---

—ॐ सत्यमेवजयते—
सुकामेवा एक आणा पाकीट
निवडक सर्व किराणा
# लोणच्याचें साहित्य
म्हणजे

मोहरीची डाळ, मोहरी भुकणी, मोहरी तेल ( पॅक बाटल्या ), मेथी भरडा, स्पेशल हिंग,
तांबडें लाल ( भडक ) तिखट भुकणी इत्यादि खात्रीचा माल तयार आहे.

लोणच्याचा तयार मसाला पूड तयार आहे!
**—: दत्तात्रय नारायण हेजीब :—**
किराणा व सुकामेवा व्यापारी, २० शुक्रवार पेठ, पुणें २
लोणचीं, पापड, मसाले, मेतकूट सर्वैव तयार असतात.

---

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
# महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गानिवास, ' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.